# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**मंगळवार, दिनांक ९ एप्रिल, २०१३**

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे -**

**दोन : शोक प्रस्ताव -**

श्री.दत्तात्रय नागोरावजी ऊर्फ बबनराव मेटकर, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) उद्योग मंत्री :**

(क) पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) कोंकण विकास महामंडळ मर्यादितचा सन २००४-२००५ या वर्षाचा चौतीसावा वार्षिक अहवाल व लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री :**

(क) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २००९-२०१० व २०१०-२०११ या वर्षांचा अनुक्रमे सत्तेचाळीसावा व अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

(ग) पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०१०-२०११ या वर्षाचा वार्षिक लेखे संविधानिक लेखा परीक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(घ) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(च) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**चार : सन २०१३ - २०१४ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (सहावा दिवस).**

(१) महसूल व वन विभाग.

(२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत - मध्यंतर )**

**पाच : सर्वश्री एकनाथराव खडसे (पाटील), सुभाष देसाई, बाळा नांदगावकर, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, नाना पटोले, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री आर.एम.वाणी, गिरीष महाजन, विवेक पाटील, नितीन सरदेसाई, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यातील अनेक पाटबंधारे प्रकल्प नियोजनाअभावी वर्षानुवर्षे अपूर्ण अवस्थेत असणे, राज्य निर्मितीपासून ७० हजार कोटी रुपये खर्च होऊनही सन २०१०-११ च्या आर्थिक पाहणी अहवालात मागील १० वर्षात सिंचन क्षमतेत ०.१ टक्के इतकी नगण्य वाढ झाल्याचे नमूद असणे, त्यानुषंगाने काढण्यात आलेल्या सिंचनाच्या श्वेतपत्रिकेवर झालेल्या चर्चेत चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या चौकशी समितीला सिंचन घोटाळ्याच्या संदर्भात कोणत्याही आरोपाचा तपास करुन दोषींविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा अधिकारच नसल्याचे त्यांनी नमूद करणे, त्यामुळे सिंचनाच्या प्रकल्पाच्या कामात झालेला गैरव्यवहार व भ्रष्टाचार शोधण्यास समितीला अपयश येण्याची शक्यता, जलसंपदा विभागातील अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया इ.मध्ये मोठ्या प्रमाणात असलेला सावळा गोंधळ, तसेच विभागातील योजनांतर्गत व योजनेतर वर्षनिहाय, लेखाशीर्ष निहाय व वैधानिक विकास मंडळ निहाय देण्यात आलेल्या निधीचा तपशीलही सन २००० पासून उपलब्ध न होणे, महालेखापरिक्षकांतर्गत जलसंपदा विभागाचे कार्यप्रगती लेखा परिक्षणामधील हाफ मार्जिन मुद्यांची माहिती देखील उपलब्ध नसणे, तसेच ग्रामविकास व जलसंधारणाच्या माध्यमातून रस्ते, पूल दुरुस्ती व परीरक्षण इ.ची कामे निधी अभावी प्रलंबित असणे, जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, मागासक्षेत्र विकास अनुदान निधी योजना, पंचायत राज संस्थांना स्वउत्पन्नविषयक बाबींसाठी अर्थसहाय्य, लघु पाटबंधारे प्रकल्प, पाणलोट व मृदसंधारण आणि सामाजिक वनीकरण, राष्ट्रीय कृषि योजना, माजी मालगुजारी तलाव दुरुस्ती कार्यक्रम व विदर्भ सधन सिंचन विकास

कार्यक्रम इ.योजना व कार्यक्रमांसाठी शासनाकडून पुरेसे लक्ष देण्यात येत नसल्यामुळे त्याच्या अंमलबजावणीत होत असलेला विलंब, परिणामी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागात शासनाचा नियोजनाचा अभाव व विविध जलसंधारणाच्या कामाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या भीषण पाणी टंचाईवर मात करण्यात शासनाला आलेले अपयश, सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ३२.१ टक्के कुटुंबांना अद्यापपर्यंत नळाने पाणी पुरवठा होत नसून ४६ टक्के लोकांना शौचालयाची देखील सोय नसल्याचे उघड होऊन ४७ टक्के ग्रामीण तर २३ टक्के नागरी कुटुंबांना स्नान गृहाची सोय नसल्याचे राष्ट्रीय नमुना पाहणी अहवालात उघड होणे आणि अल्पसंख्याक विभागांतर्गत वक्फ बोर्डाच्या मालमत्तेत मोठ्या प्रमाणात सुरु असलेला गैरव्यवहार, परिणामी राज्यातील जनतेला नियोजनाअभावी निर्माण झालेल्या विविध समस्यांमुळे होत असलेल्या त्रासामुळे त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ एप्रिल, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.